# डॉ. आंबेडकर महाविद्यालय
# दीक्षाभूमी नागपूर

**आयोजक** : **अर्थशास्त्र विभाग**

**कार्यक्रमाचे नाव** : **<u>नागरी सेवा स्पर्धा परीक्षांची तयारी आणि अर्थशास्त्र विषयाचे महत्त्व या विषयावर डॉ. प्रमोद लाखे यांचे व्याख्यान</u>**

**कार्यक्रमाचा दिनांक** : **२२.०३.२०२४**

**उपस्थित विद्यार्थी** : **९०**






डॉ. आंबेडकर महाविद्यालय दिक्षाभूमी, नागपूर

अर्थशास्त्र विभाग

दिनांक- १९/०३/२०२४

सूचना

सर्व प्राध्यापक व विद्यार्थींना सूचित करण्यात येते की आपल्या महाविद्यालयातील पदवी अर्थशास्त्र व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक १९/०३/२०२४ ला **"स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी आणि अर्थशास्त्र विषयातील विविध संधी"** या विषयावर कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे, तरी सर्वांनी या कार्यक्रमाला उपस्थिती दर्शवावी हि विनंती.

**वेळ**: सकाळी १०.०० वाजता

**स्थळ**: मिनी ऑडिटोरीयम
रूम नं ०१

**आयोजक**

**प्रा. प्रिया वानखेडे**

**डॉ. राजेंद्र तांबे**

**दिनांक: १५/०३/२०२४**

प्राचार्य
डॉ. बी.ए.मेहेरे
डॉ. आंबेडकर महाविद्यालय
दिक्षाभूमी नागपूर

PRINCIPAL
DR. AMBEDKAR COLLEGE
NAGPUR

**<u>नागरी सेवा स्पर्धा परीक्षांची तयारी आणि अर्थशास्त्र विषयाचे महत्त्व या विषयावर डॉ. प्रमोद लाखे यांचे व्याख्यान</u>**

दिनांक 19 मार्च 2024 रोजी डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर येथे **'स्पर्धा परीक्षांची तयारी आणि अर्थशास्त्र विषयाचे महत्त्व'** या विषयावर भारतीय नागरी सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्राचे संचालक तसेच वसंतराव नाईक शासकीय कला व समाज विज्ञान संस्था येथील अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रमोद लाखे यांचे नुकतेच व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानाला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सौ भुवनेश्वरी मेहेरे अध्यक्षस्थानी होत्या. हा कार्यक्रम पदवी आणि पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग यांच्यातर्फे आयोजित करण्यात आला होता.

डॉ. प्रमोद लाखे यांनी संबंध महाराष्ट्रात भारतीय नागरी सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रांमध्ये प्रवेश घेण्याची पद्धती तसेच तेथील सोयी सवलतींची उपलब्धता याविषयी सर्वप्रथम मार्गदर्शन केले. त्यानंतर नागरी सेवा म्हणजे काय तसेच त्यासाठी कुठल्या विषयांची निवड करावी याविषयी विद्यार्थ्यांना भरपूर मार्गदर्शन केले. सोबतच नागरी सेवा परीक्षा कशी घेतली जाते त्यासाठी कुठल्या विषयांची कशी विशिष्ट तयारी करावी, कुठले वृत्तपत्र वाचावेत, तसेच संदर्भ ग्रंथ कोणत्या प्रकारातील वापरावेत याविषयीची ही सखोल माहिती दिली, विद्यार्थ्यांनी नागरी सेवा पूर्व परीक्षांना सामोरे जाताना स्वतःच्या मनाची खंबीर तयारी करून घेणे आणि देशसेवेसाठी आपली कृतज्ञता सिद्ध करण्यासाठी आपण किती सज्ज असले पाहिजे याविषयीची तयारी करणे आवश्यक आहे असे त्यांनी सांगितले. अर्थशास्त्र हा विषय नागरी सेवांमध्ये वैकल्पिक विषय म्हणून ज्या विषयांच्या यादीमध्ये फार आधीपासून समाविष्ट करण्यात आलेला आहे त्यासाठी विविध विषयांवरची अर्थशास्त्राशी संबंधित संदर्भ ग्रंथांची सूची यावेळेस त्यांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सौ भूवनेश्वरी मेहेरे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त संख्येने नागरी सेवांची तयारी करावी असे आवाहन केले तसेच महाविद्यालयाकडून ज्या काही सोयी सवलती त्यांना हवे आहेत त्यासाठी महाविद्यालय कटिबद्ध असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी याप्रसंगी मार्गदर्शकांना परीक्षेशी संबंधित प्रश्न विचारले व त्यांची अतिशय उत्कृष्ट पद्धतीने डॉ. प्रमोद लाखे यांनी स्पष्टीकरण दिले तसेच विद्यार्थ्यांच्या मनातील शंका कुशंका दूर केल्या.

या कार्यक्रमात प्रा. शैलेश बहादुरे, प्रा. अंकित बनपुरकर, प्रा. तांबे, प्रा. प्रिया वाठोरे, प्रा. काजल बांबल तसेच अन्य प्राध्यापक सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.






GPS Map Camera
Google
Nagpur, Maharashtra, India
E-Leap - The DAIMSR Center For Entrepreneurship, 3rd Floor, DAIMSR, Deekshaboomi, Nagpur, Maharashtra 440010, India
Lat 21.129772°
Long 79.067794°
19/03/24 10:13 AM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Nagpur, Maharashtra, India
E-Leap - The DAIMSR Center For Entrepreneurship, 3rd Floor, DAIMSR, Deekshaboomi, Nagpur, Maharashtra 440010, India
Lat 21.129772°
Long 79.067794°
19/03/24 10:13 AM GMT +05:30


Nagpur, Maharashtra, India
E-Leap - The DAIMSR Center Fo
Deekshaboomi, Nagpur, Mahara
Lat 21.129772°
Long 79.067794°
19/03/24 10:13 AM GMT +05:3
Google


Nagpur, Maharashtra, India
E-Leap - The DAIMSR Center
Deekshaboomi, Nagpur,
Lat 21.129772°
Long 79.067794°
19/03/24 10:12 AM GMT

